# अकोल्याच्या पेट्रोल पंपावर वाहनधारकांची फसवणूक!

# पेट्रोलऐवजी पाणीच भरल्या जाते वाहनात?

- इंडियन ऑईलच्या पंपावर पेट्रोलमध्ये पाण्याचे मिश्रण आढळल्याचा ग्राहकांचा आरोप.
- पेट्रोल भरल्यानंतर अनेक वाहने सुरू झाली नाहीत, काही वाहनांना तांत्रिक समस्या आल्या.
- प्रमाणात ग्राहक पंपावर जमा झाले आणि त्यांनी संताप व्यक्त केला.
- पंप मालकांनी ग्राहकांना वाहने दुरुस्त करून देण्याचे आणि पूर्ण टाकी पेट्रोल भरून देण्याचे आश्वासन दिले.या गंभीर चुकीसाठी पेट्रोल कंपनीवर काय कारवाई होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :** शहरातील माउंट कॅरमल शाळा चौकातील इंडियन ऑईलच्या पेट्रोल पंपावर ग्राहकांना एक आगळावेगळा अनुभव आला आहे. '१ लिटर पेट्रोल खरेदी करा आणि अर्धा लिटर पाणी मोफत मिळवा' अशा भन्नाट ऑफर मुळे वाहनधारक गोंधळले आहेत. पेट्रोल भरल्यानंतर काही वाहने सुरूच न झाल्या मुळे तपासणी केली असता, पेट्रोलमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्याचे समोर आले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

अकोला शहरातील माउंट कॅरमल शाळा चौकातील इंडियन ऑईलच्या पेट्रोल पंपावर ग्राहकांची मोठी गर्दी जमा झाली. नेहमीप्रमाणे आज इंधन भरण्यासाठी आलेल्या वाहनधारकांना येथे वेगळाच अनुभव आला. काही ग्राहकांनी पेट्रोल भरल्यानंतर त्यांच्या गाड्या सुरूच झाल्या नाहीत. त्यानंतर पंपावरील इंधन तपासले असता, पेट्रोलमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास आले.एका ग्राहकाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, 'आज आम्हाला पेट्रोलसोबत बोनस म्हणून भरपूर पाणी मिळाले. पेट्रोल टाकी फुल्ल केल्यावर गाडी पेट्रोलवर कमी आणि 'पोहण्याच्या स्विमिंग पूलवर' जास्त धावेल असे वाटते.' या प्रकारामुळे अनेक ग्राहकांचे मोठे नुकसान झाले आहे, कारण त्यांच्या वाहनांना तांत्रिक बिघाड झाला आहे.ग्राहकांच्या तक्रारीनंतर पंपावर एकच गोंधळ उडाला. संतप्त ग्राहकांनी पंपावर गर्दी केली आणि व्यवस्थापकाकडे तक्रार केली. व्यवस्थापकांनी ही चूक मान्य केली आणि ग्राहकांची वाहने दुरुस्त करून देण्याचे तसेच त्यांच्या वाहनांच्या टाक्या पूर्ण भरून देण्याचे आश्वासन दिले.या चुकीमुळे पेट्रोल पंप चालकांवर मोठी जबाबदारी आली आहे. त्यांच्या हलगर्जीमुळे ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागला. आता पेट्रोल कंपनी यावर काय कारवाई करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. इंधनात पाणी मिसळवण्यासारख्या गंभीर बाबींवर कंपन्या आणि प्रशासन कठोर पाऊले उचलतात का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचा दौरा



**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :** राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे दि. १९ व २० सप्टेंबर रोजी अकोला येथे आहेत. त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : शुक्रवार दि. १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे आगमन व महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांच्या कुलगुरू व इतर अधिका-यांसमवेत बैठक, शनिवार, दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वा. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे शिवार फेरी थेट पीक प्रात्यक्षिक उद्घाटन कार्यक्रम ला उपस्थिती, दु. १.३५ वा. विद्यापीठ विश्रामगृह येथे राखीव. दु. २.३० वा. नांदेडकडे प्रयाण.

### रेडक्रॉस व डॉ. हेडगेवार रक्तपेढीतर्फे रक्तदान जागृती मोहिम

## आरोग्याच्या क्षेत्रात संस्थांचे कार्य महत्वपूर्ण –पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :** केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या सूचनेनुसार इंडियन रेडक्रॉस सोसायटीने डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या सहकार्याने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या पंधरवड्यात रक्तदान जागृती मोहिम आखली असून, त्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी कार्यालयात राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत बुधवारी करण्यात आला.रक्तदानाच्या राष्ट्रीय मोहिमेत रेडक्रॉस सोसायटी आणि डॉ.हेडगेवार रक्त पेढी या संस्थांचा मोलाचा सहभाग आहे. आरोग्याच्या क्षेत्रात दोन्ही संस्थांचे योगदान महत्वपूर्ण आहे,



असे प्रतिपादन मंत्री ॲड. फुंडकर यांनी केले.पालकमंत्र्यांच्या हस्ते मोहिमेचा फित कापून शुभारंभ झाला.

यावेळी पालकमंत्र्यांनी मनोगत व्यक्त करून उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील आदी प्रामुख्याने उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व उपस्थितांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले.प्रारंभी रेडक्रॉसचे चेअरमन डॉ. किशोर मालोकार यांनी पालकमंत्र्यांचे स्वागत करून उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे संयोजन सचिव प्रभजीत सिंह बछेर यांनी केले.

## अकोट अडगाव बु मार्ग खड्डयांनी बनला जीवघेणा, नागरिक त्रस्त

### रुंदीकरणाच्या कामामुळे अडचणीत भर

**अडगांव बु.,दि १८ (दिपक रेळे ) :** अकोट ते अडगाव बु या राज्यमहामार्ग असून हा मार्ग सध्या अक्षरशः खड्डयांचा रस्ता झाला आहे.उमरा फाटा ते अडगाव खुर्द आणि अडगाव खुर्द ते अडगाव बु या मार्गांच्या मधल्या पट्टयात ठिकठिकाणी प्रचंड मोठमोठे खड्डे पडले असून, प्रवाशांचा जीव मुठीत धरून प्रवास सुरू आहे.

या मार्गावर दररोज हजारो प्रवासी, शालेय विद्यार्थी, शेतकरी तसेच व्यापारी ये-जा करतात. मात्र रस्त्याची अत्यंत खराब अवस्था पाहता अनेकांना प्रवास करणे कठीण झाले आहे. खड्डयांमुळे वाहनांचे संतुलन बिघडून अपघात होण्याच्या घटना वाढत आहेत. विशेषतः दुचाकीस्वारांना आणि रात्री प्रवास करणाऱ्यांना सर्वाधिक धोका जाणवत आहे.या मार्गाचे रुंदीकरणाचे काम संथ गतीने सुरु असून रस्त्यावर संबंधित वाहणांची वदर्ळ सुरु असते त्यामुळे व खड्डयामुळे वाहने चालवीने दुरापास्त झाले आहे.काही दिवसापूर्वी या रस्त्यांवर झालेल्या काहींना आपले प्राण गमवावे लागेलत.पावसाळ्या मुळे खड्डयांमध्ये पाणी साचले असून, त्यांची खोली ओळखणे अशक्य झाले आहे. परिणामी अचानकपणे वाहन खड्डयात गेल्यास गंभीर अपघातांची शक्यता कायम असते. नागरिक सांगतात की, आधी रस्ता खड्डेमय होता, पण आता तर रस्ता खड्डयांतच आहे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

वाहनचालक संघटनांनी, ग्रामस्थांनी आणि विद्यार्थ्यांच्या पालकांनी हे रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी करत आहे प्रशासनाकडून केवळ तात्पुरती गड्डे बंद होते पण काही दिवसांतच ती उखडून पुन्हा रस्ता जुना होतो.नागरिकांचा इशारा आहे की, जर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात आली नाही तर मोठ्या प्रमाणावर अपघात होऊ शकतात. त्याचबरोबर, या मार्गावर होणाऱ्या अपघातांची सर्व जबाबदारी प्रशासनावर टाकण्यात येईल.



## थोडक्यात

### ताडी विक्री दुकानांचा ई– लिलाव जाहीर

**अकोला :** जिल्ह्यातील ताडी विक्री दुकानांचा ई– लिलाव जाहीर करण्यात आला असून, इच्छूकांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.ताडी दुकानांचा जाहीरनामा 'महाटेंडर्स' (www.mahatenders.gov.in ) या संकेतस्थळावर दि. २६ सप्टेंबरपर्यंत उपलब्ध राहील. तसेच ताडी दुकानांसाठी निविदा व दि. ३० सप्टेंबर रोजी लिलावात भाग घेण्यासाठी याच संकेतस्थळाचा वापर बोलीधारकांनी करावा. ई– लिलाव नि – निविदा पध्दत नवीन असल्याने काही शंका किंवा माहिती हवी असल्यास अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अकोला या कार्यालयात संपर्क साधावा. लिलावाची माहिती इच्छुकांनी संकेतस्थळावर पाहावी. ई–लिलाव –नि– निविदेच्या प्रक्रियेसंदर्भातील सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

### प्रभातचा यश काटकर बॉक्सींग मध्ये राज्यस्तरावर तिसरा

**अकोला :** प्रभात किड्स स्कूलचा यश काटकर या खेळाडूने महाराष्ट्र राज्य बॉक्सींग चॅम्पीयन २०२५ राज्यस्तरीय बॉक्सींग स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये प्रभातचा यश काटकर ह्याने उत्कृष्ट यश संपादीत केले.महाराष्ट्र राज्य बॉक्सींग चॅम्पीयनशीप २०२५ या स्पर्धेत १३ वर्ष वयोगटात व ३२ ते ३४ वजनगटामध्ये कांस्य पदक पटकाविले. जळगाव येथे दि. १७ ते २० ऑगस्ट दरम्यान झालेल्या स्पर्धेत यश काटकरने घवघवीत यश प्राप्त केले. प्रभातचे क्रीडा प्रशिक्षक राहुल वानखडे व रिया ताराम यांचे मार्गदर्शन लाभले.प्रभातच्या प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ, क्रीडा विभाग प्रमुख स्वप्नील मांदाळे व उप विभागप्रमुख आशिष बेलोकार यांच्यासह शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचार्यांनी यश काटकरचे कौतुक केले.

### प्रगतशील शिक्षक पुरस्काराने गौरव

तेल्हारा शहरातील नामांकित सेठ बंसीधर विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय चे ज्येष्ठ व आदर्श शिक्षक मोहन रतनलाल गांधी यांना अकोला येथे आयोजित कार्यक्रमात प्रगतशील शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील बहुमोल योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न,अध्यापनात नवनवीन प्रयोगशीलता याचीआणि समाजोपयोगी उपक्रमांतून विद्यार्थ्याचे मार्गदर्शन दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला आहे. गांधी यांनी अनेक वर्षापासून विज्ञान विषय अधिक सुलभ व समजण्याजोगा आहे.

## ताडी विक्री दुकानांचा ई– लिलाव जाहीर

**अकोला :** जिल्ह्यातील ताडी विक्री दुकानांचा ई– लिलाव जाहीर करण्यात आला असून, इच्छूकांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.ताडी दुकानांचा जाहीरनामा ' महाटेंडर्स' (www.mahatenders.gov.in ) या संकेतस्थळावर दि. २६ सप्टेंबरपर्यंत उपलब्ध राहील. तसेच ताडी दुकानांसाठी निविदा व दि. ३० सप्टेंबर रोजी लिलावात भाग घेण्यासाठी याच संकेतस्थळाचा वापर बोलीधारकांनी करावा. ई– लिलाव नि – निविदा पध्दत नवीन असल्याने काही शंका किंवा माहिती हवी असल्यास अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अकोला या कार्यालयात संपर्क साधावा. लिलावाची माहिती इच्छुकांनी संकेतस्थळावर पाहावी.

## सेतू केंद्र वरील विद्यार्थी,शेतकरी, शेतमजूर यांची लूट थांबवा

**अकोट,दि १८ (प्रतिनिधी) :** अकोट (जि. अकोला) – तालुक्यातील विविध सेतू सुविधा केंद्रांवरून नागरिकांना शासनाच्या सेवा पुरविताना अधिकृत शुल्काव्यतिरिक्त 'उवाच्या सव्वा' या नावाने अनधिकृत पैसे वसूल केले जात असल्याच्या गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस अकोट तालुका अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने तहसीलदारांना निवेदन देत संबंधितांवर तातडीने कारवाईची मागणी केली आहे.सर्व सेतू सुविधा केंद्रांची सखोल चौकशी करावी. दोषी कर्मचाऱ्यांवर तातडीने निलंबनासह कारवाई करण्यात यावी.दरपत्रक प्रत्येक केंद्रावर लावणे बंधनकारक करावे. नागरिकांच्या तक्रारींसाठी विशेष हेल्पलाइन आणि ऑनलाइन पोर्टल उपलब्ध करावे. राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस अकोट,सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर मानकर, विधानसभा अध्यक्ष राम वरणकार, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष ऋषिकेश अवारे,



**'शासनाच्या विविध योजना, प्रमाणपत्रे, दाखले, व शासकीय सेवा मिळवण्यासाठी नागरिक सेतू सुविधा केंद्रांचा वापर करतात. मात्र केंद्रांवरील कर्मचारी अधिकृत शुल्काशिवाय अतिरिक्त पैसे मागतात. ही सरळसरळ सामान्य जनतेची लूट आहे. अनेक वेळा गरजू नागरिक अडचणीत सापडून पैसे देण्यास मजबूर होतात.'**

**–धिरज गिते तालुकाध्यक्ष,राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस अकोट**

अकोला पूर्वविधानसभा अध्यक्ष चेतन फुकट कुटासा सर्कल प्रमुख कुलदीप नागरे,आदी युवक कॉंग्रेस चे पदाधिकारी उपस्थित होते.

### पंतप्रधान मोदीजी यांचा वाढदिवस

## ग्राम स्वच्छता अभियान राबवून साजरा




**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :** देशाचे आदरणीय पंतप्रधान यांच्या वाढ दिवसाच्या निमित्तानं सेवा पंधरवाडा अंतर्गत श्री कॅप्टन डोबाळे साहेब यांच्या नेतृत्वाखाली ताजनापूर येथे अकरा वाजता स्वच्छता अभियान राबविण्यात आले याम ध्ये यामध्ये प्रमुख म्हणून आयटीआय तील शिक्षक श्री घवाटेसर , श्रीभांभुरकरसर आणि श्री नेमाडेसर सहीत आयटी आय चे ईतर शिक्षकांसह गावातील शिक्षक श्री शरद झामरेसर तसेच प्रशिक्षणार्थी विद्यार्थी व गावकरी मंडळी असे जवळयास ५० लोकांनी विशेष योगदान दिले. या प्रसंगी सरपंच श्री विलास मेंढे उपसरपंच श्री विजय भेले व ग्राम पंचाईत सदस्य ,तंटामुक्ती अध्यक्ष गावचे तरूण व जेष्ठ आणि यांनी सर्वांनी भाग घेतला. विशेष बाब म्हणजे या संपूर्ण अभियानात गावातील वयोवृद्ध प्रतिष्ठित नागरिक श्री किसणराव डोबाळे, नंदकिशोर डोबाळे सहीत सर्वच तरुण मंडळी श्री अनिल मधुकर डोबाळे श्री देवानंद डोबाळे संतोष किसन डोबाळे योगीराज डोबाळे आणि श्रावण अनिल डोबाळे यांनी उत्स्फूर्त पणे सहभाग घेतला.

## मासेमारी साधनांसाठी खरेदीवर अर्थसाह्य

### अर्ज करण्याचे आवाहन

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :** मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना मासळी पकडण्यासाठी लागणा-या साधनांच्या खरेदीवर मत्स्यव्यवसाय विभागाकडून अर्थसाह्य दिले जाते. त्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन सहायक मत्स्यव्यवसाय अधिकारी प्रि. रा. झोड यांनी केले आहे.जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सर्वसाधारण योजनेतून मासेमारी साधनाच्या खरेदीवर अर्थसहाय्य दिले जाते. जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेतील सभासदांनी खरेदी केलेल्या नायलॉन सुत, जाळीवर ५० टक्के अनुदान देय आहे. जाळ्याच्या किमतीची कमाल मर्यादा प्रति किलोग्राम ८०० रू. आहे व भूजल क्षेत्रातील मत्स्यव्यवसायासाठी नायलॉन तयार जाळी प्रति सभासद २० किलोग्राम मर्यादेप्रमाणे अनुदान देण्यात येईल.भुजल क्षेत्रात लहान आकाराच्या होड्या वापरल्या जातात. त्यासाठी जिल्ह्यातील मासेमारी करणाऱ्या मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था यांना बिगर यांत्रिक नौका (लाकडी नौका, पत्रा नौका, फायबर नौका) खरेदीवर प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के किमान मर्यादेत अनुदान मिळते.

तरी पात्र संस्थांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी मासेमारी करणाऱ्या मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांनी प्रस्तावासोबत संस्थेच्या लेटरहेडवर विनंती अर्ज संस्थेचा ठराव, सभासद मागणी अर्ज, सभासदाचे आधार कार्ड, बँक पासबुकची छायाप्रत किंवा रद्द केलेला धनादेश आदी आवश्यक कागदपत्रे जोडून मत्स्यव्यवसाय विभागात सादर करण्याचे आवाहन केले आहे.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

### अर्जदारांना सीएससी केंद्रात माफक दरात सेवा

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना आता सीएससी केंद्रामधून महामंडळाच्या योजनांचा लाभ माफक दरात घेता येणार आहे. याबाबतचा सामंजस्य करार महामंडळाच्या मुख्य कार्यालयामध्ये महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख व सीएससी केंद्राचे प्रमुख वैभव देशपांडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला आहे.या करारानुसार अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे लाभार्थी आता त्यांच्या जवळच्या कोणत्याही सीएससी केंद्रावर जावून महामंडळाच्या योजनांचा लाभ कमी दरात घेऊ शकतील. यामध्ये महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे, योजनेची सद्य:स्थिती तपासणे आणि आवश्यक मार्गदर्शन मिळवणे यांसारख्या सुविधांचा राम ावेश आहे.सीएससी केंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध सरकारी आणि खाजगी सेवा पुरवण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. महामंडळाने सीएससी केंद्रासमवेत केलेल्या करारामुळे महामंडळाच्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाचेल.यावेळी महामंडळाचे अध्यक्ष म्हणाले, या कराराम ुळे आमची उद्दिष्ट्ये अधिक प्रभावीपणे पूर्ण होतील. राज्याच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गरजू आणि पात्र तरुणांपर्यंत महामंडळाच्या योजना पोचणार आहेत. कमी खर्चात आणि त्यांच्या घराजवळच त्यांना आवश्यक सेवा मिळाल्यामुळे त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करुन मराठा समाजातील तरुणांना उद्योजक करण्याचे महामंडळाचा उद्देश पुर्णत्वस नेणे सोपे होईल. राज्यामध्ये सीएससीचे ७२ हजार पेक्षा जास्त केंद्र कार्यरत असल्याने त्यांच्या माध्यमातून अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या लाभार्थ्यांना त्यांच्या गावातूनच पात्रता प्रमाणपत्र, कागदपत्र, बँकेचे कर्ज मजुरी, बँकेचा हप्ता अपलोड करण्यासाठी प्रत्येकी ७० रू. शुल्क आकारण्यात येईल.

## संत हे चंदना समान : हभप ज्ञानेश्वर महाराज शिंदे

### आज मुंबई येथील हभप जगन्नाथ महाराज

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :** संत व सामान्य माणसात मोठे अंतर सर्व दृष्टिकोनातून दिसून येते.संत हे चंदना समान असून स्वतः झिजून दुसऱ्याला सुख देऊन त्याच्या उन्नतीचा ध्यास करीत असतात. मात्र सामान्य माणसाची वृत्ती ही काटेरी बोरी सारखी असते.ती इतरांना कोणत्याही दृष्टिकोनातून इजा करण्यासाठीच सदा प्रयत्नशील असते. संतांच्या कृपारुपी चंदनाचा सुवास हा भक्तांना उन्नतीचा मार्ग दाखवून त्याची आत्मिक शुद्धी करीत असते. म्हणून संतांना चंदनाची उपमा दिली असल्याचा हितोपदेश आळंदी येथील कीर्तनकार हभप ज्ञानेश्वर महाराज शिंदे यांनी केला. जानोरकर मंगल कार्यालयात पितृ सेवा समितीच्या वतीने पितृपक्षात सुरू असलेल्या भागवत व कीर्तन महोत्सवात हभप ज्ञानेश्वर महाराज शिंदे यांनी कीर्तनाचे तृतीय पुष्प भक्तांना अर्पण केले. ते पुढे म्हणाले, चंदनाच्या झाडाच्या आसपास अन्य



कोणतेही झाड आले तर चंदन त्या झाडांनाही सुगंधीत करत असते. त्याचप्रमाणे संताचे असून संतांचे आचरण व अंतकरण हे व्यापक असते. ते गुणदोषाचा विचार न करता सर्वांच्या कल्याण व हिताचा सदा विचार करतात. ते समर्थ असतात. कोणतीही गोष्ट ते करू शकतात. असाध्य अशी कोणतीही बाब त्यांच्याकडे नसते. त्यांनी ठरविले तर ते अगदी भिंतीला चालवु शकतात,रेड्याच्या मुखातून वेद वदवून घेऊ शकतात. म्हणून संतांना सामर्थ्यवान असे म्हटल्या जात असल्याचे हभप ज्ञानेश्वर महाराज शिंदे यांनी यावेळी सांगितले. संताच्या परिभाषेचा उहापोह करीत असताना त्यांनी ज्याला देव कळाला तो संत असल्याचे म्हटले. लोक व्यवहारात आनंदी तर एकांतात दुखी असतात. मात्र संतांच्या संदर्भात एकांत व सार्वजनिक स्थळ हे समानच असते. म्हणून संत हे जीवनाचे खऱ्या अर्थाने पथप्रदर्शक ठरत असल्याचे हभप ज्ञानेश्वर महाराज शिंदे यांनी यावेळी सांगितले.

आपल्या कीर्तनात त्यांनी तुकोबारायांच्या गाथेचा परामर्श घेत गाथेच्या अनुषंगाने आपले कीर्तन सादर केले. हभप प्रशांत महाराज ताकोते यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या या कीर्तन उत्सवात आज शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता सिन्नर येथील हभप भगीरथ महाराज काळे यांचे कीर्तन होणार असून १९ सप्टेंबर रोजी हभप जगन्नाथ महाराज पाटील मुंबईकर यांचे कीर्तन व शनिवार दिनांक २० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता हभप प्रशांत महाराज ताकोते यांच्या काल्याच्या कीर्तनने या उत्सवाचा समारोप होणार आहे.

## मुंडगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच तुषार पाचकोर यांचा राजीनामा

**मुंडगाव :** तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखले जाणाऱ्या मुंडगाव येथील ग्रामपंचायत चे उपसरपंच तुषार पाचकोर यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा ग्रामपंचायतचे ग्राम सेवक जि.जे. जाधव यांच्याकडे दिला आहे. तुषार पाचकोर यांनी दिलेल्या राजीनामामुळे मुंडगाव सह अकोट तालुक्यातील राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.मुंडगाव येथील ग्रामपंचायत मध्ये सरपंच, उपसरपंच व १४ सदस्य आहेत. सन २०२२ मध्ये सरपंच पद हे अनुसूचित जमाती साठी होते. त्या वेळी दोन गट मैदानात उतरले होते. दोन्ही गटातून ८– ८जन निवडून आले होते. त्यावेळेस उपसरपंच तुषार पाचकोर यांनी व निवडुन आलेल्या सदस्यांनी ठरवल्याप्रम ाणे तुषार पाचकोर यांना अडीच वर्षांसाठी उपसरपंच पद देण्यात आले होते. त्यामुळे तुषार पाचकोर यांनी ठरवल्याप्रमाणे आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिला आहे सदर राजीनामा अनिल गाढे, व श्रद्धा पाचकोर या सदस्याच्या उपस्थितीत येथील ग्रामसचिव जी. जे. जाधव यांच्याकडे दिला आहे. मात्र आपला सदस्य पदाचा राजीनामा मात्र त्यांनी दिला नाही. तसेच ठरल्या प्रमाणे तुषार पाचकोर है पुढील उपसरपंच अनिल गाढे यांना बनवणार असल्याचे नागरिकाल बोलल्या जात आहे.

## जिल्ह्यात नवीन आधार सेवा केंद्रांसाठी हालचाली

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :
नवीन आधार सेवा केंद्रांसाठी हालचालींना वेग आला आहे. जिल्ह्यातील ३५ महसुली मंडळमध्ये 'आधार सेवा केंद्र'करिता इच्छुक आपले सरकार केंद्रधारकांकडून अर्ज मागवण्यात आले आहेत. संकेतस्थळ www.akola.gov.in विहीत अर्ज डाऊनलोड करुन तत्काळ सादर आवाहन करण्यात आले आहे.

## अनैतिक मानवी वाहतुक कक्ष,अपहरण गुन्हयातील पिडीतेचा कसुन शोध घेवुन १२३ गुन्हे उघडकीस

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :
अकोला जिल्हया मध्ये मा. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक सा. तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक बि. चंद्रकांत रेड्डी सा. शहर उपविभाग पोलीस उपअधिक्षक श्री. सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक कक्ष महीला व बाल अत्याचारासंदर्भाने कलम ३६३ भांदवि/१३७(२) भा. न्या. सं चा तपास करत आहे. अनैतिक मानवी वाहतुक कक्षाने आज पावेतो एकुण १२३ गुन्हे उघडकिस आणले आहेत.पोलीस स्टेशन तेल्हारा, अकोला येथील अप नं ६१/२०२५ क १३७(२) भान्यांसं चा गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक कक्ष अकोला येथे दिनांक २५/०८/२०२५ रोजी प्राप्त झाली. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये पिडीत व आरोपी यांचे शोथ कामी गुजरात, पुणे येथे पोलीस स्टॉप सह शोध घेतला मिळुन आले नाही. तरी सदर गुन्हयातील पिडीत व आरोपी यांची गुप्तबात मीदारां मार्फत माहीती काढली असता सदर पिडीता व आरोपी हे ग्राम हाता ता. बाळापुर पोस्टे उरळ जि. अकोला येथे राहत असल्याबाबत माहीती मिळाल्यावरून तपासकामी व शोध कामी वरीष्ठांना



माहीती देवुन अमावाकक्ष स्टॉप ग्राम हाता पोस्टे उरळ येथे रवाना झालो. सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान मिळालेल्या माहीती नुसार राजेंद्र किसन दामोदर यांचे कडे जावुन पिडीत व आरोपी यांचा शोध घेत असतांना पिडीत मुलगी व आरोपी हे मिळुन आले. त्यांना अनैतिक मानवी वाहतुक कक्ष अकोला येथे परत आणुन पुढील तपासकामी तपास डायरी, पिडीत मुलगी व आरोपी यांना पोलीस स्टेशन तेल्हारा, अकोला येथील पोलीस स्टॉप यांचे ताब्यात देण्यात आले.

### 'क्रेडिट अक्सेस ग्रामीण लिमिटेड व क्रेडिट अक्सेस इंडिया फाऊंडेशन तर्फे

# अकोल्यात वाहतूक नियंत्रणासाठी बॅरिकेट्स प्रदान

## पोलीस अधीक्षक आर्चित चांडक यांनी उपक्रमाचे केले कौतुक

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :
अकोला शहर आणि ग्रामीण भागात वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतुकीचे नियमन करणे हे पोलीस दला समोर एक मोठे आवाहन ठरत आहे. रस्त्यावर सुरक्षितता आणि नियमशिस्त राखण्यासाठी बॅरिकेट्सची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. हे लक्षात घेऊन क्रेडिट अक्सेस ग्रामीण लिमिटेड व क्रेडिट अक्सेस इंडिया फाऊंडेशन यांनी सामाजिक उत्तरदायित्वातून पुढाकार घेत, ट्रफिक बॅरिकेट्स पोलीस विभागास सुपूर्त केले.




दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी मा. श्री. आर्चित चांडक पोलीस अधीक्षक, अकोला यांचे प्रमुख उपस्थिती मध्ये क्रेडिट अक्सेस ग्रामीणं लिमिटेडव क्रेडिटअक्सेस इंडिया फाऊंडेशन यांनी पोलीस विभागाला ५० ट्रॅफिक बॅरिकेट्स प्रदान केले या उपक्रमामुळे वाहतुकीचे नियमन सुलभ होण्यास तसेच अपघात नियंत्रणात मदत होणार आहे. 'कंपनीचा हा सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे. अकोला जिल्ह्यात वाहतूक नियंत्रण आणि शिस्तबद्धतेसाठी अशा प्रकारची मदत महत्त्वपूर्ण ठरते. समाजातील विविध संस्था, कंपन्या आणि नागरिकांनी अशाप्रकारे प्रशासनासोबत हातभार लावल्यास अपघातमुक्त, सुरक्षित आणि नियमबद्ध वाहतूक व्यवस्था उभारता येईल. आम्हाला विश्वास आहे की, पुढील काळातदेखील हे सहकार्य असेच कायम राहील.' असे मत पोलीस अधीक्षक यांनी व्यक्त केले. उपक्रम ाचे मनापासून कौतुक केले.डिव्हिजन मॅनेजर बाबुलाल शेख यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, 'आमची संस्था केवळ वित्तीय सेवा पुरवण्यापुरती मर्यादित नाही. सामाजिक उत्तरदायित्व हा आमच्या कामाचा अविभाज्य भाग आहे. वाहतुकीच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन आम्ही दरवर्षी पोलीस विभागास मदत करत आहोत. यापुढेही समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आमचे प्रयत्न सुरूच राहतील.' एरिया मॅनेजर दिपक राऊत आणि ब्रांच मॅनेजर अमोल चव्हाण यांनीही या वेळी उपस्थित राहून आपले विचार व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, 'सुरक्षित वाहतूक ही प्रत्येक नागरिकाची गरज आहे. पोलीस विभागाच्या कामाला हातभार लावण्याचा आम्हाला अभिमान आहे.'

या कार्यक्रमास कंपनीचे डिव्हिजन मॅनेजर बाबुलाल शेख, एरिया मॅनेजर दिपक राऊत, ब्रांच मॅनेजर अमोल चव्हाण (अखऊ) सुबोध तायडे यांच्यासह कंपनीचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बंद सदनिकेमध्ये चोरी !

**अकोला :** खदान पोलिस स्टेशन हद्दीतील राष्ट्रीय महामार्गलगत असलेल्या राधाकृष्ण अपार्ट मेन्टमधील बंद सदनिकेमध्ये चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. घरातील लोक बाहेरगावी गेले होते. घरी परत आल्यानंतर त्यांच्या घरी चोरी झाल्याची बाब लक्षात आली. त्यानंतर जेम्स यांनी खदान पोलिस स्टेशन येथे धाव घेतली असून, सदनिकेम धील एक लॅपटॉव एक ग्रॅम सोने चोरी गेल्याची प्राथमिक माहिती आहे. या प्रकरणी पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया उशिरा रात्री सुरू असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## लोखंडी पाईप व काठीने युवकावर हल्ला

**मुर्तिजापूर :** शहरातील मंगलदास बाबा नगर जुनी वस्ती भागात एका २७ वर्षीय युवकावर लोखंडी पाईप व लाकडी काठीने हल्ला करून जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली. याच प्रकरणी माया प्रेम मिलांदे यांनीही विशाल मनोज मिलांदे यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशनला जबानी रिपोर्ट देऊन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आले, एकमेकांच्या विरोधात तक्रारी देऊन, आप-आपसातील भांडणापायी दोन्ही तक्रारदारांविरूद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे.फिर्यादी विशाल मनोज मिलांदे वय २७, रा. मंगलदास बाबा नगर, मूर्तिजापूर याने पोलिसात दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, त्याच्या घराशेजारी राहणारी त्याची काकू माया प्रेम मिलांदे यांनी सात महिन्यांपूर्वी ९ हजार रुपये उसने घेतले होते. याच कारणावरून आरोपी देवा प्रेम मिलांदे वय २५ व पवन प्रेम मिलांदे वय २३, रा. मंगलदास बाबा नगर यांनी १५ सप्टेंबर रोजी रात्री साडेसातच्या सुमारास फिर्यादीच्या घरी येऊन त्याचा पत्ता विचारला आणि त्याच्यावर हल्ला केला. आरोपी देवा मिलांदे याने स्टील पाइपने फिर्यादीच्या दोन्ही हातांच्या दंडावर व डाव्या पायावर मारहाण केली

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वाढदिवसा निमित्त

# अकोट येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :
पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचे वाढदिवसा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या सेवा पंधरवाड्या कार्यक्रमांतर्गत अकोट येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले.




भारतीय जनता युवा मोर्चाचे वतीने जिल्हाध्यक्ष योगेश गोतमारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आयोजित केलेल्या या शिबिरात शेकडो युवकांनी रक्तदान केले. या सेवा पंधरवाड्यानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते अकोट येथील अतिथी हॉटेलच्या प्रांगणात व सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन भाजपाचे जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर यांचे हस्ते करण्यात आले.

प्रारंभी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमांचे अतिथींच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी संतोष शिवरकर यांचे सह भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष किशोर मांगटे पाटील, छावाचे जिल्हाप्रमुख तथा भाजपाचे उपाध्यक्ष शंकरराव वाकोडे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, जिल्हा सरचिटणीस राजेश नागमते, माजी नगराध्यक्ष रामचंद्र बरेठिया यांचे मार्गदर्शन पर भाषण झाले.

# नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम परिचय कार्यक्रम





■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :
कृषी महाविद्यालय अकोला येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम परिचय कार्यक्रम दिनांक १७ सप्टेंबर २०२५ बुधवार रोजी आयोजित करण्यात आला सदर कार्यक्रम ाचे अध्यक्षस्थान कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर यांनी भूषवले तसेच या कार्यक्रमास विद्यार्थ्यांच्या पालकांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. गिरीश जेऊघाले शिक्षण शाखाप्रमुख यांनी महाविद्यालयाची स्थापना कृषी विद्यापीठाची कार्यप्रणाली याविषयी सविस्तर प्रास्ताविक केले त्यानंतर परीक्षा शाखेचे प्रमुख डॉ. दिलीप धुळे यांनी पदवी अभ्यासक्रम अंतर्गतविषय, त्यांचे श्रेयांक, नियमावली, कृषी महाविद्यालयातील विविध कार्यरत समित्या व शिस्तीचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर यांनी नवीन शैक्षणिक धोरणावर (एन ई पी २०२०) आधारित कृषी पदवी या कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमामुळे उद्योजकतेच्या संधी कशा वाढतील तसेच महाविद्यालयात कार्यरत उच्चशिक्षित प्राध्यापक वर्ग स्पर्धा परीक्षा उपलब्ध स्पर्धा परीक्षा मंच.

## तालुकास्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन



■हिवरखेड,दि १८ (प्रतिनिधी) :
महाराष्ट्र शासन शिक्षण व क्रीडा विभाग, जिल्हा क्रीडा कार्यालय व तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय तेल्हारा तालुकास्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धेचे भव्य उद्घाटन सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरखेड येथे उत्साहात पार पडले.

या स्पर्धेचे उद्घाटन महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे यांच्या हस्ते झाले. यावेळी तालुका क्रीडा संयोजक शांतीकुमार सावरकर, संस्थेचे संचालक कौस्तुभ भोपळे,तालुका क्रीडा संघाचे अध्यक्ष प्रदीप राऊत, पत्रकार संदीप इंगळे, नंदकिशोर नागपुरे,तायडे, क्रीडा शिक्षक श्रीकृष्ण बचे,नितीन मंगळे, प्रा. मिसाळ,प्रिया उजवणे,प्रशांत खिरोडकार,स्पर्धेचे पंच कृष्णा देशमुख,सतीश आमटे, आदी मान्यवर उपस्थित होते.उद्घाटनीय मनोगतात संस्थाध्यक्ष अनिलकुमार भोपळे यांनी खेळाडूंनी प्रामाणिकपणे आणि खेळाडूवृत्तीने स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले. प्राचार्य संतोषकुमार राऊत यांनी प्रास्ताविकातून संस्थेचे कार्यवाह श्यामशील भोपळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षकांच्या एकसंघ प्रयत्नांतून स्पर्धेचे यशस्वी आयोजन होत असल्याचे नमूद केले.

## सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षेचा

### 'एफडीए'ची तपासणी मोहिम

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :
अन्न व औषध प्रशासनातर्फे सणासुदीचा काळ लक्षात घेऊन मोहिम राबविण्यात येत आहे, अशी माहिती सहायक आयुक्त (अन्न) दे. गो. वीर यांनी दिली.आगामी काळात नवरात्र, दसरा, दिवाळी असा सणासुदीचा काळ लक्षात घेऊन मिठाई, खाद्यपदार्थांची दुकाने तपासण्यात येत आहेत.

अन्न सुरक्षा अधिकारी यांनी नुकतेच काही अन्न दुकानांची सखोल तपासणी करून एका पेढीचे परवाने निलंबित केले आहेत. तसेच तूप, तेल (सोयाबीन, शेंगदाणा तेल व सुपर पामोलिन), मिठाई तसेच इतर अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणास्तव घेतले आहेत.

# इतर मागास प्रवर्गातील लोकांना स्वयंरोजगाराची सुवर्ण संधी

## इमाव वित्त आणि विकास महामंडळाचे उपक्रम

■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :
राज्यातील इतर मागास प्रवर्गातील लोकांना स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी तसेच उच्च शिक्षणाकरिता शासनाने बहुजन कल्याण विभागांतर्गत महाराष्ट्र इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळामार्फत कृषी संलग्न व्यवसाय वृद्धीसाठी अत्यंत अल्प व्याजदराने तसेच बिनव्याजी दराने कर्ज वितरीत करण्यात येते.ही योजना राज्यातील राष्ट्रीयकृत बँकेमार्फत राबविली जाते. यामध्ये महामंडळाचा सहभाग २०, लाभार्थ्यांचा सहभाग ५, व बँकेचा सहभाग ७५ टक्के असतो. या योजनेमध्ये महत्तम प्रकल्प मर्यादा रु. ५ लक्ष आहे. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे.ही योजना महामंडळामार्फत राबविली जाते. यामध्ये महत्तम कर्ज मर्यादा रु. १ लक्ष असून परतफेडीचा कालावधी ४ वर्ष आहे. या योजनेत शेतीला पूरक किंवा इतर छोट्या व्यवसायाकरिता कर्ज दिले जाते. परतफेडीचा कालावधी ५ वर्षे असून नियमित परतफेड केल्यास व्याज आकारले जात नाही, परंतु थकीत झालेल्या हप्त्यांवर वार्षिक ४% व्याज दर आकारण्यात येते. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लक्ष पर्यंत असावे. अर्जदाराचे वय १८ ते ५५ वर्ष असावे. गरजू व कुशल व्यक्तींना नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी तसेच व्यवसाय वृद्धीकारिता ही योजना राज्यातील राष्ट्रीयकृत बँकमार्फत तसेच सहकारी बँकेमार्फत राबविली जाते. व्यवसायाकरिता मागणीनुसार १ ते १० लक्ष पर्यंत बँकेमार्फत देण्यात येते. बँकेचे कर्ज नियमित परतफेड केल्यास महामंडळामार्फत १२% पर्यंत व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरुपात लाभार्थीला देण्यात येते. लाभार्थी कर्जासाठी ऑनलाइन महामंडळाच्या संकेतस्थळावर अर्ज करावा. कुटुंबाचे वार्षिक वय उत्पन्न ८ लक्ष पर्यंत असावे. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे.उच्च शिक्षणाकरिता देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय अभ्याक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता रु. १० ते २० लक्ष इतके महत्तम कर्ज बँकेमार्फत दिले जाते.बँकेचे कर्ज नियमित परतफेड केल्यास महामंडळामार्फत १२ टक्केपर्यंत ब्याज परतावा रक्कम अनुदान स्वरुपात लाभार्थीला देण्यात येते. अर्जदार इयत्ता बारावी मध्ये ६० टक्के व अधिक गुणांनी उत्तीर्ण असावा. अर्जदाराचे वय १७ ते ३० असावे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लक्ष पर्यंत असावे.इतर मागासवर्गीय प्रवर्गातील गरीब व होतकरू महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी राज्यातील बचत गटातील उत्पादित केलेल्या वस्तूंचे उत्पादन प्रक्रिया व मूल्य आधारित उद्योगांकरिता बँकेमार्फत मंजूर करण्यात आलेल्या रु. ५ ते १० लक्ष पर्यंतच्या कर्ज रक्कमेवरील १२ टक्के व्याज परतावा उपलब्ध करून देण्यात येते. सदर योजना महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत लोकसंचालित साधन केंद्राच्या सहाय्याने राबविण्यात येते.

# पंतप्रधान यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुख्यमंत्री पंचायतराज अभियानाचा शुभारंभ



■अकोला,दि १८ (प्रतिनिधी) :
दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सेवा पंधरवडा राष्ट्रनेता माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त व मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री पंचायत राज अभियानाचा शुभारंभ आज वाडेगाव ग्रामपंचायत च्या वतीने ग्रामसभा ९ ते १० या वेळात घेण्यात आली या कार्यक्रम ाला सरपंच मंगेश तायडे माहिती सांगीतली कार्यक्रमाला सुरुवात केली पदाधिकारी शिवबा प्रभात संघाच्या अध्यक्ष ज्योती इंगळे कोषाध्यक्ष रंजना काळे भरारी ग्राम संघाच्या अध्यक्ष छायाताई मानकर खैरुणिसा शेख चांद आयसीआरपी शारदा मानकर स्नेहाकींता मानकर शारदा भटकर दिपाली मानकर सुवर्ण मानकर मोनिका मानकर दुर्गा सोनटक्के रेखा मसने पुष्पा वाढोकार कृषी सखी लिपिका शितल पळसकर उमेद बचत गट अध्यक्ष मयुरी लोध रजनी लोध दुर्गा लोध माधुरी धनोकार शिल्पा पोटदुखे प्रीती लोध सुभाष सरप शशिकांत राहणे यांनी संचालन केले पत्रकार शेख चांद व गावकरी सर्व बचत गटातील महिला यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

### पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या वाढदिवशी

## महसूल विभागाच्या दुहेरी तेजस्वी अभियानाची गावागावांत सुरुवात

■मुर्तिजापुर,दि १८ (प्रतिनिधी) :
दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रनेता मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त महसूल व ग्रामविकास विभागाच्या दोन महत्वाकांक्षी अभियानांना ग्रामसभांमधून प्रारंभ झाला. यामुळे संपूर्ण ग्रामीण भागात विकासाची नवी उमेद आणि आशावाद पसरला आहे.

ग्रामविकास विभागामार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार असून, पंचायत संस्था बळकट करण्याबरोबर शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यावर भर राहणार आहे.तर महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महारास्व अभियानांतर्गत सेवा पंधरवाडा १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान तीन टप्यात होणार आहे. पहिल्या टप्यात ४१ गावांमध्ये शिवार फेरी घेऊन रस्त्यांची नोंद व अतिक्रमण



हटविण्याचे आवाहन करण्यात आले. दुसऱ्या टप्यात 'सर्वांसाठी घरे' अंतर्गत पट्टेवाटप तर तिसऱ्या टप्यात लोकअदालती व जनसंवाद कार्यक्रम होणार आहेत.या दुहेरी अभियानांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळावा यासाठी प्रशासनाने आवाहन केले आहे.माधापुरी येथे आमदार हरिषभाऊ पिंपळे यांचे मार्गदर्शन झाले. गटविकास अधिकारी मिलिंद मोरे, नायब तहसीलदार महेश नागोलकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रभारी तहसीलदार रवींद्र राऊत यांनी पारद, भटोरी, शेलूबोंडे तर परिविक्षाधीन तहसीलदार गिरीजादेवी लोखंडे यांनी मोहखेड व निंभा ग्रामसभेत सहभाग घेतला.या अभियानांतून गावोगावी विकासाची नवी पहाट उजाडण्याची आशा व्यक्त होत आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

